# महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६ ००४.

क्र.कोविमं/शाखा/१२ वी परीक्षा/ ४२१६
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक- २८/०७/२०२०

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/ कोल्हापूर

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./मार्च २०२० मूळ गुणपत्रक वितरणाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की , फेब्रु./मार्च २०२० च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविद्यालया मार्फत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची मूळ गुणपत्रके संबंधित वितरण केंद्रावरुन शुक्रवार दि. ३१ / ०७ /२०२० रोजी सकाळी ११.०० वा हस्तपोच वाटप केले जाणार आहेत . त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजलेपासून संबंधित कनिष्ठ महाविद्यालयानी विद्यार्थ्यांना त्यांचे गरजेनुसार व सोयीनुसार शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व नियमांचे व सूचनांचे पालन करुन गुणपत्रिकांचे वाटप करण्यात यावे. विद्यार्थ्यांना एका विशिष्ठ तारखेसच घेवून जाणेबाबत आग्रह करु नये. तसेच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पालक /विद्यार्थी यांची एकाचवेळी गर्दी होणार नाही याची दक्षता घेवून नियोजन करावे.

तरी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रतिनिधीस अधिकृत पत्रासह दि.३१/०७ /२०२० रोजी वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी .

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.**

Rao general